# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः22.12.2025** **वारःसोमवार**

---

1)महाराष्ट्रात २८८ नगरपालिका, आणि २८५ नगराध्यक्षपदांच्या निवडणूक निकालात महायुतीतल्या घटक पक्षांची सरशी, भाजपाला सर्वाधिक जागा
2) अरुणाचल प्रदेश आणि मेघालयमध्येही स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपाची सरशी
3) जी राम जी आणि शांती विधेयकावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची स्वाक्षरी,
4) रेल्वेची भाडेवाढ येत्या २६ तारखेपासून लागू होणार
आणि
महिला क्रिकेटमध्ये श्रीलंकेविरुद्ध T 20 मालिकेत भारताची 1-0 अशी आघाडी

**<u>निवडणूक निकाल</u>**
महाराष्ट्रातल्या २८८ नगरपरिषदांच्या आणि २८५ नगराध्यक्षपदांच्या निवडणुकांचे निकाल काल जाहीर करण्यात आले.

या निवडणुकीत भाजपा 117 जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष राहिला तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षानं 53 आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं 37 जागा जिंकल्या आहेत. काँग्रेसला 28, शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 7, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला 9 जागा मिळाल्या तर अपक्ष आणि इतरांना 37 जागा मिळाल्या आहेत.

तीन नगराध्यक्ष पदांसाठीच्या निवडणूका याआधीच बिनविरोध झाल्या होत्या. या निवडणुकीत स्थानिक पातळीवर महायुती आणि महाविकास आघाडीच्या घटक पक्षांच्या वेगवेगळ्या तडजोडी झाल्या होत्या तर काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होत्या.

पुणे निकाल
पुणे जिल्ह्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निकालांमध्ये जिल्ह्यातील 17 पैकी 10 ठिकाणी नगराध्यक्षपद अजित पवार गटाकडे गेलं आहे. दरम्यान जेजूरी नगरपरिषदेच्या निकालानंतर गुलालची उधळण आणि फटाके फोडताना आगीचा भडका उडाल्यानंतर 16 जण भाजल्याची घटना घडली आहे.

भाजपा आणि महायुतीचा विजय म्हणजे लोकांनी विकास कामाला दिलेली पावती असल्याचं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

या निवडणुकीत मतदार प्रक्रियेचा गोंधळ घातला गेला तसंच ही निवडणूक मुक्त आणि निर्भय वातावरणात झाली नसल्याची टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

**<u>अरुणाचलनिवडणूक</u>**

अरुणाचल प्रदेशातल्या स्थानिक संस्था निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षांनं मोठा विजय मिळवला आहे. या निवडणुकांसाठी १५ डिसेंबर रोजी मतदान झाले होते. भाजपने इटानगर महानगरपालिका निवडणुकांमध्येही निर्णायक विजय मिळवला असून २० पैकी 14 प्रभागांमध्ये यश मिळवलं.

क्षेत्रीय पक्ष, अरुणाचल पीपल्स पार्टी ,पासीघाट महानगरपालिकामध्ये आठ पैकी पाच जागा तर भाजपने दोन जागांवर विजय मिळवला. एक जागा अपक्ष उमेदवाराने मिळवली. विरोधी पक्ष ,काँग्रेसला या दोन्ही निवडणुकांमध्ये एकही जागा जिंकता आली नाही. मुख्यमंत्री पेमा खांडू यांनी पक्षाच्या प्रचंड विजयाबद्दल मतदारांचे आभार मानले आहेत. राज्य निवडणूक आयोगाने काल रात्री जाहीर केलेल्या अंतिम निकालांनुसार, जिल्हा परिषदेच्या २४५ जागांपैकी, ५९ बिनविरोध जागांसह १७० जागा भाजपनं जिंकल्या आहेत, त्यामुळे जिल्हा स्तरावरील स्थानिक संस्थांवर त्याचे स्पष्ट वर्चस्व प्रस्थापित झालं आहे. तर PPA 28 जागांसह दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला आहे.

मेघालय

मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा यांच्या नेतृत्वातील राष्ट्रीय जन पार्टी, एनपीपी ने एका बिनविरोध जागेसह पाच जागा जिंकल्या तर अपक्ष आणि इतर उमेदवारांनी 23 जागा जिंकल्या. ग्राम पंचायत निवडणुकांमध्ये पुनरावृत्ती करत, भाजपने 8 हजार 208 पैकी 6,हजार 85 जागा जिंकल्या, यामध्ये 5 हजार 211 जागांवर त्यांनी बिनविरोध विजय मिळवला. पीपीएने 648 जागा जिंकल्या तर अपक्षांनी 627 जागा जिंकल्या. राष्ट्रीय काँग्रेस पक्षांनं (एनसीपी) ने 396 जागांवर विजयमिळवला . एनपीपींनं 160 तर लोक जनशक्ति पक्षांनं (एलजेपी) 27 जागा जिंकल्या. आम आदमी पक्षाला एका जागेवर यश मिळालं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणुकीत अथक परिश्रम घेतलेल्या सर्व ठिकाणच्या कार्यकर्त्यांचे आणि मतदारांचे आभार मानले आहेत.

**<u>राष्ट्रपतिशांतिविधेयक</u>**

विकसित भारत रोजगार हमी आणि आजीविका अभियान ग्रामीण, म्हणजे जी राम जी विधेयकावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वाक्षरी केली आहे. मनरेगा योजनेची जागा घेणारा हा कायदा एका आर्थिक वर्षात ग्रामीण भागातल्या प्रत्येक कुटुंबात १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी देतो. गेल्या आठवड्यात संसदेच्या दोन्ही सभागृहांनी हे विधेयक मंजूर केलं होतं. ग्रामीण भागात आत्मनिर्भरता, समृद्धी ,

सर्वसमावेशक विकास आणि सक्षमीकरण ही या कायद्याची उद्दिष्टं आहेत. हा कायदा ग्रामीण भारताच्या विकासातला मैलाचा दगड ठरेल असं ग्रामविकास मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

राष्ट्रपतींनी ,शीतकालीन अधिवेशनात संसदेनं मंजूर केलेल्या नवीकरणीय आण्विक ऊर्जा विकास आणि वापर म्हणजेच SHANTI विधेयकाला मान्यता दिली आहे. हे विधेयक नागरी आण्विक क्षेत्राशी संबंधित सर्व कायद्यांचा समावेश करते आणि त्यात खासगी भागधारकांच्या सहभागासाठी मार्ग खुले करते.

**<u>रेल्वेभाडे</u>**

रेल्वेने प्रवास भाड्यात बदल केले असून ते येत्या २६ डिसेंबरपासून लागू होणार आहेत. यात सर्वसामान्य वर्गाच्या प्रवास भाड्यात २१५ किलोमीटर अंतरापर्यंत काहीही बदल झालेला नाही. त्यापुढच्या सामान्य वर्गाच्या प्रवासाकरता प्रतिकिलोमीटर एक पैसा तर मेल - एक्सप्रेस गाड्यांसाठी प्रति किलोमीटर २ पैसे भाडेवाढ झाली आहे. ५०० किलोमीटर अंतराच्या प्रवासाकरता १० रुपये जास्त मोजावे लागतील. उपनगरी गाड्याच्या प्रवासभाड्यात बदल केलेला नाही असं रेल्वेच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

**<u>कोलकाता हत्ती</u>**

रेल्वे अपघातांमुळे हत्तींच्या होपणाऱ्या मृत्यू वर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालय उपाययोजना राबवणार आहे. यासाठी अपघात-प्रवण क्षेत्रांची माहिती घेण्याचे आदेश रेल्वेला देण्यात आले आहेत. केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी काल पश्चिम बंगालमधल्या सुंदरबन क्षेत्रातल्या गोदाव इथं पत्रकारांशी संवाद साधला. हे सांगितले. हत्तींनी केलेल्या हल्ल्यात मृत झालेल्यांच्या कुटुंबियांना दिल्या जाणाऱ्या नुकसान भरपाईची प्रक्रियाही सुलभ करण्यात येणार आहे.

दरम्यान,अरवली पर्वतरांगाची नवी व्याख्या केवळ मोठ्या प्रमाणावर खाणकामाला मोकळीक देण्यासाठी केली असल्याच्या आरोपाचं केंद्र सरकारने खंडन केलं आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी काल सुंदरबन व्याघ्रप्रकल्पात वार्ताहरांना सांगितलं की सर्वोच्च न्यायालयानं या परिसरात नवीन खाणकामाला स्थगिती दिली आहे. आणि नवीन व्याख्येनुसार अरवली डोंगररांगांमधला ९० टक्के परिसर संरक्षित झाला आहे.

**<u>शुभांशू पुम</u>**

'भारत २०४० मध्ये चंद्रावर उतरण्याची तयारी करत आहे. कदाचित तिथे पडणारं  पहिले पाऊल तुमचं असू शकतं. सातत्यपूर्ण प्रयत्न, चिकाटी, निर्धार आणि कठोर परिश्रमातून हे स्वप्न सत्यात उतरवा,' असं प्रतिपादन अंतराळवीर आणि भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांनी काल पुण्यात केलं. शुभांशू शुक्ला यांनी पुणे पुस्तक महोत्सवाला भेट दिली.

या वेळी त्यांनी आपल्या अंतराळ मोहिमेचे रोमांचक अनुभव पुणेकरांसमोर मांडले.  भारतात नवीन अद्ययावत प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येत असून, भारतीय अंतराळवीरांना या केंद्रात प्रशिक्षित होता येणार असल्याची माहितीही शूभांशू शुक्ला यांनी यावेळी दिली.
पुणे पुस्तक महोत्सवाची काल सांगता झाली. लाखों जणांनी या पुस्तक महोत्सवाला भेट दिली असून कोट्यावधी रुपयांची उलाढाल नोंदवली गेली आहे.
राष्ट्रीय गणित दिवस

भारताचे सर्वात प्रभावशाली आणि जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जयंती निमित्त आज राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात येत आहे. शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था आणि अकादमिक मंचांवर गणिताचे वैज्ञानिक प्रगती आणि दैनंदिन जीवनातील महत्त्व अधोरेखित करण्यासाठी साजरा केला जातो. रामानुजन यांच्या असाधारण योगदानाच्या स्मरणार्थ सरकारने डिसेंबर २०११ मध्ये २२ डिसेंबर हा राष्ट्रीय गणित दिन म्हणून घोषित केला. त्यानंतर २०१२ हे वर्ष देशात राष्ट्रीय गणित वर्ष म्हणून साजरे करण्यात आले.

**<u>दिव्यकलामेळा</u>**

नवी दिल्लीतल्या कर्तव्य पथावर काल दिव्य कला मेळ्याच्या २८व्या आवृत्तीचा समारोप  विविधरंगी कार्यक्रमांच्या सादरीकरणाने झाला.  या नऊ दिवसांच्या मेळयात देशभरातून आलेल्या दिव्यांगांच्या सर्जनशील आणि रचनात्मक उत्पादनाना सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीनं प्रदर्शन आणि विक्रीसाठी मंच उपलब्ध करून देण्यात आला होता. दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या वतीनं आयोजित या दिव्य कला मेळ्यामध्ये २० राज्यांमधून  १०० पेक्षाजास्त दिव्यांग कारागीर आणि उद्योजक सहभागी झाले होते.

**<u>विमानकंपन्या</u>**

धुकं आणि कमी दृश्यमानतेमुळे विमान वाहतूक विस्कळीत झाली, तर  विमान कंपन्यांनी प्रवाशांच्या सोयींबाबतच्या नियमांचं काटेकोरपणे पालन करावं, आणि विमानतळांवर पुरेसे कर्मचारी नियुक्त करावेत तसच प्रवाशांना विमानाच्या स्थितीबाबत वेळेवर आणि अचूक माहिती द्यावी, प्रवासाला अधिक विलंब झाला, तर भोजन आणि अल्पोपहाराची व्यवस्था करावी, तिकीट रद्द झाल्यास पुन्हा आरक्षण अथवा तिकिटाच्या पैशाचा परतावा करण्याची व्यवस्था करावी असे निर्देश केंद्र सरकारनं दिले आहेत. हवाई वाहतूक मंत्रालयानं याबाबतचं प्रसिद्धीपत्रक जारी केलं.

**<u>क्रिकेट19</u>**

भारत आणि पाकिस्तानच्या १९ वर्षांखालील क्रिकेट संघांमध्ये दुबई इथं आशिया चषक स्पर्धेच्या  अंतिम सामन्यात भारताचा 191 धावांनी पराभव झाला. पाकिस्ताननं समीर मिन्हासच्या १७२ धावांच्या जोरावर भारतासमोर विजयासाठी ३४८ धावांचं आव्हान ठेवलं होतं. प्रत्युत्तरादाखल भारतीय संघ केवळ 156 धावांपर्यंत मजल मारू शकला. मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. भारताचा निम्मा संघ १० षटकांतच माघारी परतला होता.

**<u>महिला</u>**

महिला क्रिकेटमध्ये, भारतीय संघांनं काल रात्री विशाखापट्टणममध्ये झालेल्या पहिल्या T20 आंतरराष्ट्रीय सामन्यात श्रीलंकेला आठ गडी राखून पराभूत करत पाच सामन्यांच्या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे. श्रीलंकेच्या 122 धावांचं लक्ष्य भारताने 14 षटक आणि 4 चेंडूत पूर्ण केलं.भारताकडून जेमिमा रोड्रिग्जने 44 चेंडूत 69 धावा केल्या. तिला सामनावीर घोषित करण्यात आलं. कर्णधार हर्मनप्रीत कौर च्या नेतृत्वाखाली विश्वचषकाच्या तयारीचा भाग म्हणून श्रीलंकेविरुद्ध पाच T20 सामने खेळणार आहे. मालिकेतला दूसरा सामना उद्या विशाखापट्टणममध्ये खेळला जाईल, तर उर्वरित तीन सामने तिरुवनंतपुरममध्ये होतील.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.